दाखल तारीख: १९/०९/२०१९
नोंदणी तारीख: १९/०९/२०१९
निकाल तारीख: ०४/०८/२०२६
कालावधी: ६वर्षे १०महिने १६दिवस

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात पुलगाव, ता.देवळी, जि.वर्धा**

**(पीठासीन अधिकारी आशिष महिपती चव्हाण यांचेसमोर)**

**इतर. कि. फौ. अर्ज क्र.८४/२०१९.**

**(CNR : MHWR070010582019)**

**नि.क्र.४७**

**शिल्पा चंद्रकांत मेश्राम,**
वय – २९ वर्ष, व्यवसाय – घरकाम.
रा. विलास महादेवरावजी कुसरे, कवठा (झोपडी),
ता.देवळी, जि. वर्धा. ..... **अर्जदार.**

**विरुध्द**

**१. चंद्रकांत संतोषराव मेश्राम,**
वय– ३९, व्यवसाय– खाजगी नोकरी,
**२. सुजाता कैलाश डोफे,**
वय– ४५, व्यवसाय– घरकाम,
रा. फ्रेंडस कॉलनी, वार्ड नं.१, बुट्टीबोरी, नागपुर.
**३. कविता प्रिन्स श्रीमाल,**
वय– ३८, व्यवसाय– घरकाम,
रा. राताखेत बाल शिक्षा सदर स्कुल,
मलातलाई, उदयपुर (राजस्थान) ..... **गैरअर्जदार.**

**प्रकरण – <u>कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५</u>.**

---

**उपस्थित वकिल :–**

अर्जदार तर्फे विधिज्ञ श्रीमती.एस.एम.रामटेके

उत्तरवादी क्र.१ व ३ तर्फे प्रकरण एकतर्फा.

उत्तरवादी क्र.२ तर्फे श्रीमती.एम.एम.कोठेकर

---

## <u>न्यायनिर्णय</u>

## (दिनांक ०४/०८/२०२६)

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज उत्तरवादी क्र.१ ते ३ यांच्या विरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २००५ चे कलम १२ अंतर्गत दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार यांची अर्जामधील हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे,

अर्जदार व उत्तरवादी क्र.१ हे पती पत्नी आहे. उत्तरवादी क्र.१ व २ हे अर्जदार हिची ननंद आहे. अर्जदार व उत्तरवादी क्र.१ यांचा विवाह दि.२९/०३/२००८ रोजी कवठा (झोपडी), ता.देवळी, जि. वर्धा येथे संपन्न झाला. लग्नापुर्वी अर्जदार व उत्तरवादी क्र.१ यांचे प्रेमसंबंध होते. लग्नानंतर अर्जदार हया नांदण्याकरीता उत्तरवादी क्र.१ यांच्या एकत्र कुटुंबामध्ये कवठा (झोपडी), ता.देवळी, जि. वर्धा येथे गेल्या. अर्जदार यांनी पुढे नमुद केले आहे की, लग्नाच्या सुरुवातीपासुनच उत्तरवादी क्र.१ हा अर्जदार यांच्या चारित्र्यावर संशय घेऊन अर्जदार यांना शिविगाळ व मारहाण करत होता. तसेच उत्तरवादी क्र.१ हा अर्जदार हिस लग्नामध्ये समाधानकारक भेटवस्तु व सोन्याचे दागिने मिळाले नाही म्हणुन मारहाण करीत होता. उत्तरवादी क्र.१ हा अर्जदार हिस वारंवार

माहेरहुन पैसा आणण्याकरीता तगादा लावत होता. उत्तरवादी क्र.२ व ३ देखील उत्तरवादी क्र.१ यास अर्जदार हिच्या विरुध्द भडकवित होते. अर्जदार यांनी पुढे नमुद केले आहे की, दि.२५/१०/२००८ रोजी अर्जदार यांनी मुलगी तन्वी हिस जन्म दिला. सदरहु बाळंतपणाचा संपुर्ण खर्च अर्जदार यांच्या आईवडिलांनी केला होता. मुलीच्या जन्मानंतर देखील उत्तरवादी क्र.१ यांच्या वागण्यात कोणताही फरक पडला नव्हता.

**०३.** अर्जदार यांनी नमुद केले आहे की, उत्तरवादी क्र.१ हा अर्जदार व त्यांच्या मुलीस घेऊन बुट्टीबोरी येथे राहण्यास आला. सदरहु ठिकाणी उत्तरवादी क्र.१ हा वैभव ग्राफीक्स या कंपनीमध्ये ऑपरेटर म्हणुन नोकरी करीत होता. बुट्टीबोरी येथे देखील उत्तरवादी क्र.१ हा अर्जदार हिच्या चारित्र्यावर संशय घेऊन शिविगाळ व मारहाण करीत होता. उत्तरवादी क्र.२ ही बुट्टीबोरी येथे उत्तरवादी क्र.१ यांच्या घरालगत राहण्यास होती. उत्तरवादी क्र.२ हिचे नेहमी घरी येणेजाणे असायचे व ती उत्तरवादी क्र.१ यास अर्जदार विरुध्द भडकवित असे व त्यामुळे उत्तरवादी हा अर्जदार हिस नेहमी मारहाण करीत होता. अर्जदार यांनी पुढे नमुद केले आहे की, दि.२१/१२/२०१२ रोजी अर्जदार यांनी मुलगी तेजु हिस जन्म दिला. दुस–या बाळंतपणाचा संपुर्ण खर्च अर्जदार यांच्या आईवडिलांनी केला होता. त्यानंतर देखील उत्तरवादी क्र.१ हा अर्जदार यांना नेहमी मारहाण करुन घरातुन हाकलुन दयायचा. अर्जदार यांनी पुढे नमुद केले आहे की, दि. १६/०२/२०१८ रोजी उत्तरवादी क्र.१ याने अर्जदार हिचे सर्व सोन्याचे दागिने निर्मल उज्ञवल क्रेडिट को–ऑपरेटिव्ह सोसायटी नागपुर येथे रक्कम रु.४०,२१६/– ला गहाण ठेवले व अदयापही सोडवले नव्हते. उत्तरवादी क्र.३ हि नेहमी उत्तरवादी क्र.१ यास अर्जदार हिच्या विरुध्द भडकवित होती व त्यामुळे उत्तरवादी क्र.१ हा अर्जदार हिस मारहाण करीत होता. दि.१६/१२/२०१८ रोजी उत्तरवादी क्र.१ हा अर्जदार यांच्या माहेरी आला व अर्जदार

यांच्या आईवडिलांसमोर अर्जदार हिस मारहाण केली व बुट्टीबोरी येथे आल्यास जिवे मारुन टाकीन अशी धमकी दिली. सदरहु घटनेची तक्रार देण्यास अर्जदार हया पुलगांव पोलिस स्टेशन येथे गेले असता महिला तक्रार निवारण केंद्र येथे पाठवण्यात आले. त्यानंतर दि.१८/०८/२०१९ रोजी उत्तरवादी क्र.१ यांनी अर्जदार हिस अश्लील भाषेत शिविगाळ करुन बेदम मारहाण केली. सदरहु वेळी उत्तरवादी क्र.१ हे अर्जदार हिस तिच्या आईवडिलांकडुन पैसे घेऊन ये अथवा तिकडेच राहा असे म्हणाले. त्यामुळे नाईलाजस्तव अर्जदार या दि.१८/०८/२०१९ पासुन त्यांच्या आईवडिलांकडे स्वतःचे जिवन व्यतीत करीत आहे.

**०४.** अर्जदार यांनी पुढे नमुद केले आहे की, दि.२१/०८/२०१९ रोजी उत्तरवादी हा अर्जदार यांच्या आईवडिलांच्या घरी आला व अर्जदार हिच्या दोन्ही मुलींना जबरदस्ती बुट्टीबोरी येथे घेऊन आला. त्यामुळे दि.२२/०८/२०१९ रोजी अर्जदार हया बुट्टीबोरी येथे गेले असता उत्तरवादी क्र.१ याने अर्जदार यांना मारहाण केली. सदरहू घटनेबाबत अर्जदार यांनी बुट्टीबोरी पोलिस स्टेशन येथे उत्तरवादी क्र.१ यांच्या विरोधात तक्रार दाखल केली. सदरहु वेळी पोलिसांसमक्ष उत्तरवादी क्र.१ यांनी अर्जदार हिस स्पष्टपणे नांदवण्यास नकार दिला. अर्जदार यांनी पुढे नमुद केले आहे की, उत्तरवादी क्र.१ हा बुट्टीबोरी येथे सन विजय या खाजगी कंपनीमध्ये ऑपरेटर म्हणुन कार्यरत असुन दरमहा रक्कम रु.४०,०००/– कमवितो. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करून संरक्षण आदेश, अर्जदार हिला उत्तरवादी क्र.१ यांच्याकडून उदरनिर्वाहाकरीता दरमहा रक्कम रू.१५,०००/–, घरभाडे पोटी रक्कम रु.३,०००/–, अर्जदार हिला तिचे संपुर्ण सोन्याचे दागिने व आंदण देण्याची. तसेच अर्जदार हिच्या दोन मुली तनवी व तेजु यांचा ताबा उत्तरवादी यांच्याकडुन अर्जदार हिच्या ताब्यात देण्याची विनंती केली आहे. अर्जदार

यांनी नुकसान भरपाईपोटी रक्कम रू.५,००,०००/– देण्याची विनंती केली आहे.

**०५.** उत्तरवादी क्र.२ यांनी त्यांचे म्हणणे नि.१९ वरती दाखल करुन अर्जदार यांनी केलेल्या आरोप नाकारले आहेत. उत्तरवादी क्र.२ यांनी नमुद केले आहे की, उत्तरवादी क्र.१ व अर्जदार यांचा प्रेम विवाह आहे. उत्तरवादी क्र.१ यांच्या दोन्ही बहिणी म्हणजेच उत्तरवादी क्र.२ व ३ हे आपआपल्या पतीच्या घरी दुस–या गावी नांदत होत्या. अर्जदार व उत्तरवादी क्र.१ यांचा प्रेम विवाह असल्यामुळे त्यांच्या लग्नात कोणत्याही प्रकारचे आंधन मिळालेले नाही. उत्तरवादी क्र.२ यांनी पुढे नमुद केले आहे की, उत्तरवादी क्र.१ यांना दोन मुली झाल्या होत्या. सदरहु वेळी दवाखाण्याचा संपुर्ण खर्च उत्तरवादी क्र.१ यांनीच केला होता. अर्जदार हिला मुलींबद्दल अजिबात जिव्हाळा नव्हता. उत्तरवादी क्र.२ यांनी नमुद केले आहे की, अर्जदार हि वारंवार माहेरी निघुन जात होती व बरेच दिवस अर्जदार ही सासरी येत नव्हती. अर्जदार ही दोन्ही मुलींना उत्तरवादी क्र.१ यांच्या भरोश्यावर सोडुन जात होती. उत्तरवादी क्र.२ यांनी पुढे नमुद केले आहे की, अर्जदार हिला उत्तरवादी क्र.२ कडुन कधीही त्रास नव्हता व अर्जदार यांच्याकडे गैरअर्जदार क्र.२ चे कधीही जाणे येणे नव्हते. अर्जदार यांनी उत्तरवादी यांच्या विरोधात कोणताही संबंध नसतांना खोटी केस दाखल केली आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खारिज करण्याची विनंती उत्तरवादी क्र.२ यांनी केली आहे.

**०६.** प्रस्तुत प्रकरणात उत्तरवादी क्र.१ व ३ यांना नोटीस प्राप्त होवुन देखील प्रस्तुत प्रकरणात हजर झाले नाहीत. त्यामुळे सदरहु प्रकरण उत्तरवादी क्र.१ व ३ यांचेविरुध्द नि.१ वरील दिनांक १३.०३.२०२० रोजीच्या आदेशान्वये प्रकरण एकतर्फा चालवण्यात आले आहे.

**०७.** अर्जदार यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.३३ वर दाखल केले आहे. तसेच

अर्जाच्या पुष्टयर्थ सुचनापत्र नि.३९ व नि.४०, सोने गहाण पावती नि.४१, सोने गहाण पैसे भरल्याची पावती नि.४२, मालमत्ता पत्रक नि.४३ व कर पावती नि.४४ वरती दाखल केलेले आहे. अर्जदार यांनी नि.४५ वरील पुरसिस नुसार त्यांचा पुरावा बंद केलेला आहे. तसेच नि.४६ वरील आदेशान्वये उत्तरवादी क्र.२ यांचा पुरावा बंद करण्यात आला.

**०८.** अर्जदार यांच्या वकीलांचा अंतिम युक्तीवाद ऐकला. अंतिम युक्तीवादाकरीता उत्तरवादी क्र.२ व त्यांचे वकिल गैरहजर.

**०९.** प्रस्तुत अर्ज, दस्ताऐवज व अभिलेखावरचा एकंदरीत पुरावा पाहता माझे विचाराधीन खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे व निष्कर्ष सुसंगत कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत,

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जदार यांचा उत्तरवादी क्र.१ ते ३ यांनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे व अर्जदार ही सरंक्षणाचे आदेश होवुन मिळण्यास पात्र असल्याचे सिध्द केले आहे काय? | होय. |
| २) | अर्जदार यांनी त्यांना उत्तरवादी क्र.१ यांच्या कडुन दरमहा र.रु.१५,०००/– इतकी पोटगी मिळण्यास पात्र असल्याचे सिध्द केले आहे काय ? | अंशत: होय. उत्तरवादी क्र.१ यांनी अर्जदार यांना दरमहा र.रु.३,०००/– एवढी पोटगी देणेचे आहे. |
| ३) | अर्जदार यांनी त्यांना उत्तरवादी क्र.१ यांच्या कडुन | अंशत: होय. |

| | | |
|---|---|---|
| | भाडेपोटी रक्कम रु.३०००/- अथवा वेगळी निवा-याची सोय करण्याची आदेश मिळण्यास पात्र असल्याचे सिध्द केले आहे काय ? | जाबदार क्र.१ यांनी अर्जदार यांना दरमहा र.रु.२०००/- एवढे घरभाडे देणेचे आहे. |
| ४) | अर्जदार यांनी त्यांचे उत्तरवादी यांच्याकडे असलेले सोन्याचे दागिने व स्त्रीधन मिळण्यास पात्र असल्याचे सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ५) | अर्जदार हया उत्तरवादी यांच्याकडुन त्यांच्या दोन्ही मुली नामे तन्वी व तेजु यांचा ताबा मिळण्यास पात्र असल्याचे सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ६) | अर्जदार हया उत्तरवादी क्र.१ यांच्या नावे असलेले घर त्यांनी विकु नये असा आदेश मिळण्यास पात्र असल्याचे सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ७) | अर्जदार यांनी त्यांना र.रु.५,००,०००/- इतकी नुकसानभरपाई मिळण्यास पात्र असल्याचे सिध्द केले आहे काय ? | अंशत: होय. |
| ८) | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## - का र ण मि मां सा -

**मुद्दा क्र. १ बाबत -**

**१०.** अर्जदार यांनी दाखल केलेल्या पुराव्याचे शपथपत्र नि.३३ मध्ये अर्जातील संपुर्ण मजकुर पुनर्लिखीत केलेला आहे. अर्जदार यांनी पुराव्यादरम्यान कथन केले आहे की,

त्यांचा विवाह उत्तरवादी क्र.१ यांच्याशी दि.२९/०३/२००८ रोजी कवठा (झोपडी) येथे संपन्न झालेला होता. अर्जदार व उत्तरवादी क्र.१ यांचा सदरहु विवाह हा प्रेम विवाह आहे. अर्जदार व उत्तरवादी क्र.१ यांना सदरहु लग्न बंधनातुन तेजु व तन्वी या दोन मुली आहेत. अर्जदार व उत्तरवादी क्र.१ यांचा विवाह व त्यांच्या अपत्यांबाबत उत्तरवादी यांचा आक्षेप नाही. अर्जदार यांनी पुढे कथन केले आहे की, लग्नाच्या सुरुवातीपासुनच उत्तरवादी क्र.१ हा अर्जदार यांच्या चारित्र्यावर संशय घेऊन अर्जदार यांना शिविगाळ व मारहाण करत होता. तसेच उत्तरवादी क्र.१ हा अर्जदार हिस लग्नामध्ये समाधानकारक भेटवस्तु व सोन्याचे दागिने मिळाले नाही म्हणुन मारहाण करीत होता. उत्तरवादी क्र.१ हा अर्जदार हिस वारंवार माहेरहुन पैसा आणण्याकरीता तगादा लावत होता. उत्तरवादी क्र.२ व ३ देखील उत्तरवादी क्र.१ यास अर्जदार हिच्या विरुध्द भडकवित असल्याचे कथन अर्जदार यांनी केले आहे. अर्जदार यांनी पुढे कथन केले आहे की, उत्तरवादी क्र.२ ही बुट्टीबोरी येथे उत्तरवादी क्र.१ यांच्या घरालगत राहण्यास होती व ती उत्तरवादी क्र.१ यास अर्जदार विरुध्द भडकवित असे व त्यामुळे उत्तरवादी हा अर्जदार हिस नेहमी मारहाण करीत होता.

**११.** पुराव्यादरम्यान अर्जदार यांनी पुढे कथन केले आहे की, दि.१६/१२/२०१८ रोजी उत्तरवादी क्र.१ हा अर्जदार यांच्या माहेरी आला व अर्जदार यांच्या आईवडिलांसमोर अर्जदार हिस मारहाण केली व बुट्टीबोरी येथे आल्यास जिवे मारुन टाकीन अशी धमकी दिली. सदरहु घटनेची तक्रार देण्यास अर्जदार हया पुलगांव पोलिस स्टेशन येथे गेले असता महिला तक्रार निवारण केंद्र येथे पाठवण्यात आले. सदरहु म्हणण्याच्या पुष्टयर्थ अर्जदार यांनी त्यासंबंधीचे सुचनापत्र नि.३९ वर दाखल केलेले आहे. अर्जदार यांनी पुढे कथन केले आहे की, दि.१८/०८/२०१९ रोजी उत्तरवादी क्र.१ यांनी अर्जदार हिस अश्लील भाषेत शिविगाळ करुन बेदम मारहाण केली. सदरहु वेळी

उत्तरवादी क्र.१ हे अर्जदार हिस तिच्या आईवडिलांकडुन पैसे घेऊन ये अथवा तिकडेच राहा असे म्हणाले. त्यामुळे नाईलाजस्तव अर्जदार या दि.१८/०८/२०१९ पासुन त्यांच्या आईवडिलांकडे स्वतःचे जिवन व्यतीत करीत आहे. दि.२२/०८/२०१९ रोजी अर्जदार हया बुट्टीबोरी येथे गेले असता उत्तरवादी क्र.१ याने अर्जदार यांना मारहाण केली होती. सदरहू घटनेबाबत अर्जदार यांनी बुट्टीबोरी पोलिस स्टेशन येथे उत्तरवादी क्र.१ यांच्या विरोधात तक्रार दाखल केली. सदरहु म्हणण्याच्या पुष्टयर्थ अर्जदार यांनी त्यासंबंधीचे सुचनापत्र नि.४० वर दाखल केलेले आहे.

**१२.** अर्जदार यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार यांनी त्यांना झालेल्या कौटुंबिक छळाबाबतची कथने तारखेसहीत केलेली आहेत. तसेच अर्जदार यांनी कथन केलेल्या घटनांबाबत वेळोवेळी पोलिस स्टेशन येथे तक्रारी केल्या होत्या. सदरहु तक्रारी संबंधातील सुचनापत्र नि.३९ व नि.४० व अर्जदार यांच्या दि.२२/०८/२०१९ रोजीच्या जबाबाची छायांकित प्रत अभिलेखावरती दाखल केल्या आहेत. तसेच अर्जदार हिच्या पुराव्यावरुन असे दिसुन येते की, उत्तरवादी क्र.१ यांनी अर्जदार यांच्या चारित्र्यावर संशय घेऊन वारंवार अर्जदार यांना शिवीगाळ व मारहाण केली होती. तसेच अर्जदार यांनी उत्तरवादी क्र.२ व ३ यांच्या विरोधात देखील छळाबाबतची स्पष्ट कथन केले असल्याचे अर्जदार यांच्या पुराव्यावरुन अभिप्रेत होते. उत्तरवादी क्र.१ हे अर्जदार यांच्या माहेरहुन पैसे आणण्याकरीता तगादा लावत असल्याचे स्पष्ट कथन अर्जदार यांनी केलेले आहे. प्रस्तुत प्रकरण हे उत्तरवादी क्र.१ व ३ यांच्या विरुध्द एकतर्फा चालले असल्याने उत्तरवादी क्र.१ व ३ यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही अथवा अर्जदार यांचा उलटतपास घेण्यात आलेला नाही. तसेच उत्तरवादी क्र.२ यांनी प्रस्तुत प्रकरणात त्यांचे म्हणणे दाखल केले आहे व अर्जदार यांनी केलेल्या

कथनांचा इन्कार केला आहे. परंतु उत्तरवादी क्र.२ यांनी अर्जदार यांचा उलटतपास घेतला नाही अथवा स्वतः साक्षीपुरावा दिलेला नाही. त्यामळे अर्जदार यांनी केलेली कथने व त्यांचा पुरावा हा अखंडीत व विनाआव्हानीत राहीलेला आहे. उत्तरवादी क्र.१ ते ३ यांनी अर्जदार यांच्या कथनांचे खंडण करणे जरुरीचे होते. परंतु उत्तरवादी यांना नोटीस रुजु होवुन देखील ते प्रस्तुत प्रकरणात हजर झालेले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी दिलेला पुरावा व केलेली कथने ग्राहय धरण्यास कोणतीही हरकत नाही. त्याचबरोबर अर्जदार यांच्या पालनपोषणाची जबाबदारी उत्तरवादी क्र.१ याने न घेतल्याने अर्जदार यांचा आर्थीक छळ देखील झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे वरील एकंदरित विवेचनावरुन उत्तरवादी यांनी अर्जदार यांचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सिध्द होते. तरी अर्जदार यांचा सदरहु कौटुंबिक छळापासुन संरक्षणाचे आदेश पारीत करणे जरुरीचे आहे त्यामुळे मी मुददा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u> –**

**१३.** अर्जदार यांनी पुराव्यादरम्यान असे कथन केले आहे की, त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे अर्जदार हया त्यांचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असल्याचे अर्जदार यांनी कथन केले आहे. अर्जदार यांनी पुढे कथन केले आहे की, उत्तरवादी क्र.१ हा बुट्टीबोरी येथे सन विजय या खाजगी कंपनीमध्ये ऑपरेटर म्हणुन कार्यरत असुन दरमहा रक्कम रु.४०,०००/– कमवितो. परंतु अर्जदार यांनी उत्तरवादी क्र.१ यांचे उत्पन्न सिध्द करण्यांबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अथवा इतर कोणताही साक्षीदार तपासला नाही. तसेच अर्जदार यांनी त्यांचे मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्र अभिलेखावरती दाखल केलेले नाही. उत्तरवादी क्र.१ यांनी प्रस्तुत प्रकरणात हजर होवून अर्जदार यांच्या कथनांचे खंडण करणे जरुरीचे होते. परंतु प्रस्तुत प्रकरणाची नोटीस

मिळून देखील उत्तरवादी क्र.१ प्रस्तुत प्रकरणात हजर झाले नाहीत. त्यामुळे अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे उत्तरवादी क्र.१ हे कमवण्यास सक्षम आहेत असे दिसून येते. त्याचबरोबर उत्तरवादी क्र.१ यांना त्यांचे नोकरीमधून दरमहा कमीत कमी र.रु.२०,०००/– ऐवढे उत्पन्न मिळत असावे असा निष्कर्ष काढण्यास कोणतीही हरकत नाही. त्यामुळे उत्तरवादी क्र.१ हे अर्जदार यांचे पालन पोषण करण्यास सक्षम आहेत असे गृहित धरण्यास कोणतीही हरकत नाही.

**१४.** अर्जदार या उत्तरवादी यांच्या नात्याने पत्नी आहे. त्यामुळे अर्जदार यांची पालनपोषणाची नैतिक जबाबदारी ही उत्तरवादी यांची आहे व उत्तरवादी हे त्याकरीता बांधील आहेत. तसेच अर्जदार हे उत्तरवादी यांच्या जिवनशैलीप्रमाणे जगण्यास पात्र आहेत. त्यामुळे अर्जदार ही दरमहा पोटगी मिळण्यास पात्र आहेत. तरी उत्तरवादी क्र.१ यांचे एकुण उत्पन्न, त्यांच्यावरील जबाबदा–या व त्यांची जिवनशैली पहाता अर्जदार यांना दरमहा रुपये ३,०००/– इतकी रक्कम निर्वाह, औषधोपचारापोटी इ. करीता देणे उचित ठरेल. तसेच अर्जदार यांना अंतरीम पोटगी देण्याचे आदेशीत झाले नव्हते. त्यामुळे वरील नमुद पोटगी अर्जदार यांना सदरहु अर्ज दाखल तारखेपासुन देण्याचे न्यायोचित होईल. येणेप्रमाणे मुददा क्र.२ चे उत्तर अंशत: होकारार्थी देत आहे.

**<u>मुददा क्र. ३ बाबत</u> –**

**१५.** अर्जदार यांनी पुराव्यादरम्यान कथन केले आहे की, दि.१८/०८/२०१९ रोजी उत्तरवादी क्र.१ यांनी अर्जदार हिस अश्लील भाषेत शिविगाळ करुन बेदम मारहाण केली होती. सदरहु वेळी उत्तरवादी क्र.१ हे अर्जदार हिस तिच्या आईवडिलांकडुन पैसे घेऊन ये अथवा तिकडेच राहा असे म्हणाले होते. त्यामुळे नाईलाजस्तव अर्जदार या दि.१८/०८/२०१९ पासुन त्यांच्या आईवडिलांकडे स्वतःचे जिवन व्यतीत करीत

असल्याचे कथन अर्जदार यांनी केले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी उत्तरवादी क्र.१ यांच्याकडुन भाडेपोटी दरमहा रक्कम रु.३,०००/– अथवा पर्यायी निवास व्यवस्था करण्याची मागणी केली आहे. परंतु अर्जदार यांनी सदरहु मागणीच्या अनुषंगाने कोणतेही भाडे पावती अथवा भाडे करार दाखल केलेला नाही. वर कथन केल्याप्रमाणे उत्तरवादी क्र.१ यांनी अर्जदार यांची उलटतपासणी घेतली नाही अथवा त्यांचा पुरावा दाखल केलेला नाही. तरी अर्जदार यांच्या वरील नमुद कथनाचे उत्तरवादी क्र.१ यांच्याकडुन खंडन करण्यात आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी दिलेला पुरावा व केलेली कथने ग्राहय धरण्यास कोणतीही हरकत नाही. तरी अर्जदार यांना दरमहा रक्कम रु.२,०००/– हे घरभाडेपोटी देण्याचे न्यायोचित होईल. येणेप्रमाणे मुददा क्र. ३ चे उत्तर अंशत: होकारार्थी देत आहे.

**मुददा क्र. ४ बाबत –**

**१६.** अर्जदार यांनी पुराव्यादरम्यान कथन केले आहे की, दि. १६/०२/२०१८ रोजी उत्तरवादी क्र.१ याने अर्जदार हिचे सर्व सोन्याचे दागिने निर्मल उज्ञवल क्रेडिट को–ऑपरेटिव्ह सोसायटी नागपुर येथे रक्कम रु.४०,२१६/– ला गहाण ठेवले होते. सदरहु कथनाच्या पुष्टयर्थ अर्जदार यांनी त्यासंबंधीची पावती नि.४१ वरती दाखल केलेली आहे. नि.४१ चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सदरहु सोने गहाण पावती ही दि.१६/०२/२०१८ रोजीचे असुन अर्जदार यांच्या नावे आहे. अर्जदार यांनी पुढे कथन केले आहे की, सदरहु सोने गहाण हे अदयापही उत्तरवादी क्र.१ यांनी सोडवले नव्हते. पुढे अर्जदार यांनी सदरहु सोने गहाण बाबत पैसे भरल्याची पावती नि.४२ वरती दाखल केलेली आहे. नि.४२ वरील पावतीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सदरहु सोने गहाण बाबत रक्कम रु.३५,०७०/– जमा करण्यात आले होते. तसेच नि.४१

वरील सोने तारण फॉर्म हा अर्जदार यांच्या नावे असुन कर्ज परतफेड मुदत ही एक वर्षाकरीता होती. त्यामुळे सदरहु सोने हे अर्जदार की उत्तरवादी क्र.१ यांनी तारण ठेवले होते याबाबत साशंकता निर्माण होते. त्याचबरोबर तारण ठेवलेले सोने हे पुर्ण रक्कम भरुन कर्जफेड करुन सोडवण्यात आले किंवा कसे याबाबतचा पुरावा अभिलेखावरती दाखल नाही. त्यामुळे अर्जदार हया सदरहु सोन्याचे दागिने परत मिळण्यास पात्र नाहीत. येणेप्रमाणे मुददा क्र. ४ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुददा क्र. ५ बाबत –**

**१७.** अर्जदार यांनी त्यांच्या दोन्हीही मुले नामे तन्वी व तेजु यांचा ताबा उत्तरवादी क्र.१ यांच्या ताब्यातुन अर्जदार यांच्या ताब्यामध्ये देण्याची विनंती केली आहे. अर्जदार व उत्तरवादी क्र.१ यांच्या दोन्हीही मुली हया उत्तरवादी क्र.१ यांच्या ताब्यामध्ये आहेत. अर्जदार यांनी सदरहु दोन्ही मुलींना प्रस्तुत प्रकरणात पक्षकार केलेले नाही. अर्जात नमुद असल्याप्रमाणे अर्ज दाखल करतेवेळी मुलगी तन्वी ही १३ वर्षे व मुलगी तेजु ही ७ वर्षाची होती. सदरहु प्रकरण दाखल झाल्यापासुन दोन्हीही मुलींचा ताबा उत्तरवादी क्र.१ यांच्याकडे आहे. उत्तरवादी क्र.१ हे प्रस्तुत प्रकरणामध्ये हजर झालेले नाहीत. तरी प्रस्तुत प्रकरणातील एकंदरीत परिस्थीती पाहता अर्जदार यांच्या दोन्ही मुलींचा ताबा हा प्रदिर्घ काळापासुन उत्तरवादी क्र.१ यांच्याकडे आहे. तसेच अर्जदार यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान दोन्हीही मुलींचा ताबा उत्तरवादी क्र.१ यांच्याकडुन अर्जदार यांच्याकडे का दयावा याबाबत कोणतेही स्पष्ट कथन अथवा कारण नमुद केलेले नाही. त्यामुळे मुलगी तन्वी व तेजु यांचा ताबा उत्तरवादी क्र.१ यांच्याकडे ठेवणे न्यायोचित होईल. त्यामुळे अर्जदार हया दोन्हीही मुलींचा ताबा मिळण्यास पात्र नाही. येणेप्रमाणे मुददा क्र.५ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुददा क्र. ६ बाबत</u> –**

**१८.** अर्जदार यांनी प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जान्वये उत्तरवादी क्र.१ यांच्या नावे असलेली नागपुर येथील मिळकत कोणालाही न विकण्याचे मनाई हुकुम विनंती केली आहे. अर्जदार यांनी त्यासंबंधी पुराव्यादरम्यान गाव नमुना ८ ची प्रत (नि.४३) दाखल केली आहे. सदरहु प्रतीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, मालमत्ता क्र.२०/०१ ही उत्तरवादी क्र.१ व अर्जदार यांच्या संयुक्त नावाने आहे. तसेच सदरहु मालमत्तेवरती अर्जदार यांचे सह मालक म्हणुन नाव असल्याने ती उत्तरवादी क्र.१ यांना एकटयाने विकता येणार नाही. त्याचबरोबर सदरहु गाव नमुना ८ हा दि.१७/१०/२०२३ रोजीचा आहे. त्यामुळे सदरहु मालमत्ता ही आजही उत्तरवादी क्र.१ व अर्जदार यांच्या नावे आहे असे म्हणता येणार नाही. अर्जदार यांनी सदरहु घर मालमत्तेबाबत चालुचा गाव नमुना ८ दाखल करणे जरुरीचे होते. परंतु अर्जदार यांनी तो दाखल केलेला नाही. तरी उत्तरवादी क्र.१ यांच्या विरुध्द मनाई हुकुम जारी करणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे मुद्दा क्र.६ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

**<u>मुददा क्र. ७ व ८ बाबत</u> –**

**१९.** पुढे अर्जदार यांनी त्यांना झालेल्या कौटुंबिक छळाची नुकसान भरपाई म्हणुन र.रु.५,००,०००/– मागितले आहेत. परंतु अर्जदार यांनी त्यांच्या अर्जात किंवा त्यांच्या पुराव्यामध्ये या संदर्भात कोणतेही स्पष्ट कथन केले नाही अथवा त्या संदर्भात कोणताही पुरावा आणलेला नाही. तरी उत्तरवादी क्र.१ यांची एकंदरीत परिस्थीती पाहता अर्जदार यांना एकरक्कमी र.रु.५०,०००/– एवढी नुकसान भरपाई देणे न्यायोचित होईल. सबब, मी मुददा क्र.७ चे उत्तर अंशत: होकारार्थी देत आहे. वरील एकंदरित विवेचनावरुन मुददा क्र.८ बाबत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे;

## आदेश

१. अर्ज अंशत मंजुर करण्यात येत आहे.

२. उत्तरवादी क्र.१ ते ३ यांनी अर्जदार यांचा कोणत्याही प्रकारे कौटुंबिक छळ अथवा हिंसाचार करण्यापासुन प्रतिबंधीत करण्यात येते.

३. उत्तरवादी क्र.१ यांनी अर्जदार यांना दरमहा र.रु.३,०००/– (र.रु तीन हजार मात्र) इतकी पोटगी सदरहु अर्ज दाखल तारखेपासुन देण्याची आहे.

४. उत्तरवादी क्र.१ यांनी अर्जदार यांना दरमहा र.रु.२,०००/– (र.रु.दोन हजार मात्र) इतकी घरभाडे सदरहु अर्ज दाखल तारखेपासुन देण्याची आहे.

५. उत्तरवादी क्र.१ यांनी अर्जदार यांना एकरक्कमी र.रु.५०,०००/–(र.रु.पन्नास हजार मात्र) नुकसान भरपाई म्हणुन द्यावयाची आहे.

६. सदरहु न्यायानिर्णयाची प्रत ही उत्तरवादी क्र.१ ते ३ राहत असलेल्या स्थळसिमेतील पोलीस स्टेशन येथे पाठवण्यात यावी.

७. सदरील न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार व उत्तरवादी क्र.१ ते ३ यांना मोफत देण्याची आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

CHAVAN ASHISH MAHIPATI
Digitally signed by CHAVAN ASHISH MAHIPATI
Date: 2026.08.04 16:39:29 +0530

**ठिकाण – पुलगाव.** **(आशिष महिपती चव्हाण)**

**दि. ०४/०८/२०२६.** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, पुलगाव.**

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Judgment and order.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | Shri. T. V. Bari Stenographer Grade-III |
| Name of Court | : | Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Pulgaon. |
| Date of Order | : | 04/08/2026. |
| Order signed by the Presiding officer on | : | 04/08/2026. |
| Order uploaded on | : | 04/08/2026. |